# स्टॅच्यू ऑफ युनिटी




ईशा टुर्ससोबत भेट दिलेल्या ‘स्टॅच्यू ऑफ युनिटी’बद्दल:

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते आणि एकात्म भारताचे प्रणेते भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांचा ‘स्टॅच्यू ऑफ युनिटी’ हा पुतळा आहे. गुजरात राज्याच्या राजपिपळा शहराजवळ नर्मदा धरणाजवळील साधू बेटावर उभारलेला असून १८२ मीटर (५९७ फूट) उंचीचा हा जगातील सर्वात उंच पुतळा आहे.



१३५ मीटर उंचावर असलेली २०० पर्यटक क्षमता असलेली दर्शक गॅलरी

सरदार वल्लभभाई पटेल यांची १८२ मीटर उंचीची भव्य प्रतिमा, वॉल ऑफ युनिटी, प्रदर्शन हॉल, संग्रहालय, १३५ मीटर उंचावर असलेली २०० पर्यटक क्षमता असलेली दर्शक गॅलरी (पुतळ्याच्या पायथ्यामधून दोन लिफ्टद्वारे या ठिकाणी पोचता येतं.), कॅफेटेरीया, सिविनीयर शॉप, लाईट अॅन्ड साऊंड शो, २३० हेक्टर्वर पसरलेली व्हॅली ऑफ फ्लॉवर्स अशी अनेक आकर्षणं असलेल्या या ठिकणी ८०० वाहनांची पार्किंगची व्यवस्थाही आहे.




भारतीय मूर्तिकार राम व्ही. सुतार यांनी ही संरचना (डिझाईन) केली होती. ऑक्टोबर २०१४ मध्ये, या प्रकल्पाची संरचना, बांधकाम आणि देखभाल यासाठी २९८९ कोटी रुपयांचा करार लार्सन अॅन्ड ट्यूब्रो यांच्याशी केला होता. पुतळ्याचे बांधकाम ३१ ऑक्टोबर २०१४ पासून सुरू झाले आणि ऑक्टोबर २०१८ मध्ये पूर्ण झाले. आणि पटेलांच्या जयंतीच्या दिवशी ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पुतळ्याचे उद्घाटन केले.



७०,००० टन सिमेंट, १८,५०० टन रीइनफोर्समेंट स्टील, १,७०० टन कांस्य आणि ६,००० टन स्टॅकचरला स्टील यांचा वापर करून साकर झालेल्या या पुतळ्यासाठी भारतातील १,६९,०७८ गावांमधून लोखंड आणि माती जमा केली गेली.




सोमवार वगळता सर्व दिवशी सायंकाळी ७ ते ८ मधल्या अर्ध्या तासात 'स्टॅच्यु ऑफ युनिटी' वर एक लेजर शो आयोजित केला जातो. सरदार पटेलांचं जीवन चरित्र, ब्रिटीशांविरुद्ध त्यांनी केलेला संघर्ष आणि संस्थानांचं भारतात केलेलं विलिनीकरण असे विषय या शोमध्ये अंतर्भूत केले गेले आहेत. उच्च प्रतीचं तंत्रज्ञान, भारदस्त आवाज, प्रेरणादायी विवेचन आणि एकात्मतेची भावना निर्माण करणारा हा लेजर शो अवश्य पहावा असाच आहे. शो संपल्यावर उत्स्पूर्तणे भारत मातेचा जयजयकार करत जाणारी जनता त्याची साक्ष असते.

सातपुडा आणि विंध्याचल पर्वतमाला यांचं मनोहर दृश्य असलेलं गुजरातच्या नर्मदा जिल्ह्यातल्या केवडीया (बडोद्यापासून ९० किमीवर) या गावातून इथे पोचता येतं.

**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/